केंद्र शासनाच्या डिजिटल क्रॉप सर्व्हे - तांत्रिक व अनुषंगिक अडचणीमुळे ई-फेरफार प्रणालीद्वारे ग्राम महसूल अधिकारी स्तरावर पिक पाहणी करणेबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२६/ ई- १९१२३४८/भूमापन
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ६ नोव्हेंबर, २०२६.

संदर्भ :- कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय **क्रमांक : संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१५७/१०अे,** दि.१४.१०.२०२४

प्रस्तावना:-

राज्यात दि.१५.८.२०२१ पासून शेतकऱ्यांना स्वत:च्या मोबाईलद्वारे शेतातील पिकांची नोंदणी करता यावी आणि पीक नोंदणीची प्रक्रिया पारदर्शक व सुलभ व्हावी, या उद्देशाने ई-पीक पाहणी कार्यपद्धती कार्यान्वित करण्यात आली आहे. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, दि.१४.१०.२०२४ नुसार ॲग्रीस्टॅक अंतर्गत पीक नोंदणीसाठी राज्य शासनाच्या ॲपमध्ये आवश्यक तांत्रिक सुधारणा करून पीक नोंदणी दि.१.१२.२०२४ पासून सुरु केली आहे. यामध्ये शेताच्या बांधापासून २० मीटरच्या अंतरमर्यादेत राहून पीक नोंदणी करणे, पिकाची दोन छायाचित्रे घेणे तसेच सहाय्यक लॉगिनद्वारे पीक नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार ॲपद्वारे केवळ ऑनलाइन पीक नोंदणी करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या डिजिटल क्रॉप सर्व्हे या मोबाईल ॲपद्वारे राज्यात दि.११.८.२०२६ पासून पीक नोंद करण्यात येत आहे. तथापि, डिजिटल क्रॉप सर्व्हे ॲपमध्ये चालू खरीप हंगामाकरिता काही तांत्रिक व भौगोलिक स्थानाशी संबंधित अडचणींमुळे पीक नोंदणी करणे शक्य होत नाही. यास्तव, अशा अडचणींमुळे डिजिटल क्रॉप सर्व्हे ॲपद्वारे ऑनलाइन पीक नोंदणी करणे शक्य होत नसलेल्या प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांच्या पिकांची नोंदणी प्रलंबित राहू नये, यासाठी पर्यायी व्यवस्था

करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांमध्ये संबंधित अडचणींचे निराकरण करण्याचा प्रयत्न करूनही नोंदणी करणे शक्य होत नसल्यास, अशा प्रकरणांसाठी चालू खरीप हंगामाकरिता ई-फेरफार प्रणालीद्वारे पीक नोंदणी करण्याची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

चालू खरीप हंगामाकरिता केंद्र शासनाच्या डिजिटल क्रॉप सर्व्हे मोबाईल ॲपमध्ये उदाहरणदाखल खाली नमूद तांत्रिक तसेच भौगोलिक स्थानाशी संबंधित अडचणींमुळे पीकांची नोंदणी करता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.:-

(१) प्रत्यक्ष शेतामध्ये संबंधित गटाच्या २० मीटरच्या आत उभे असतानाही मोबाईल ॲपमध्ये सदर गटांचे अंतर अधिक असल्याचे दर्शविण्यात येत आहे,

(२) दोन वेगवेगळ्या गावांचे नकाशे मोबाईल ॲपमध्ये परस्पर बदलून (Interchange) दर्शविण्यात येत असल्यामुळे पीक नोंदणी करता येत नाही,

(३) काही ठिकाणी संपूर्ण गावांचे नकाशे मोबाईल ॲपमध्ये उपलब्ध नसल्यामुळे सदर गावांमध्ये पीक नोंदणी करणे शक्य होत नाही,

(४) काही गावांमध्ये विशिष्ट गट क्रमांक व गटातील काही शेतकरी यांची नावे (खाते क्रमांक/farm ID) मोबाईल ॲपमध्ये पीक नोंदणीसाठी उपलब्ध होत नाहीत.

उपरोक्त तांत्रिक अडचणी तसेच भौगोलिक स्थानाशी संबंधित अडचणींमुळे डिजिटल क्रॉप सर्व्हे ॲपद्वारे ऑनलाइन पीक नोंदणी करणे शक्य होत नसलेल्या प्रकरणांमध्ये पीक नोंदणी प्रलंबित राहू नये, यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून चालू खरीप हंगामाकरिता ई-फेरफार प्रणालीद्वारे पीक नोंदणी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. त्यानुषंगाने पुढील आवश्यक तांत्रिक कार्यवाही पूर्ण करून संबंधित क्षेत्रीय महसूल यंत्रणेस आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांनी निर्गमित कराव्यात.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा संकेतांक २०२६११०६१७३५५६०८४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.11.12 15:15:46 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री [नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)] यांचे सचिव.
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव.
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
६. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७. सर्व मा. विधान सभा सदस्य व विधान परिषद सदस्य
८. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
१०.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१२.महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४.विभागीय आयुक्त (सर्व).
१५.जिल्हाधिकारी (सर्व).
१६. भूमापन कार्यासन संग्रहार्थ